# मोरारजी देसाई

लेखक व चित्रकार

**रमेश मुधोळकर**

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ४.४.५. दिनांक ......
क्र. ......
विभाग

BVBK-0400445

अनमोल प्रकाशन, पुणे २

प्रकाशक :

मो. द. नांदुरकर
अनमोल प्रकाशन
६८३, बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२

★

प्रथमावृत्ती :

६ सप्टेंबर १९७८

★

मुद्रक :

लेफ्ट. कर्नल वि. वा. जोशी
सकाळ छापखाना
५९५ बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२

★

मुखपृ[redacted] :
रमेश मुधोळकर

★

किमत दीड रुपाया

# १

मुंबई ते सुरत या रेल्वे मार्गावर बलसाड स्टेशन लागते. ते रेल्वेस्टेशन असून समुद्रकिनाऱ्यावर असल्याने बंदरही आहे.

या बलसाडपासून तीन मैलांवर भदेली नावाचे खेडे आहे. तेथे एक मुलगा राहात होता. घरची परिस्थिती गरिबीची. रोज तीन मैल पायपीट करून त्याला बलसाडच्या शाळेत जावे लागे.

वाटेत औरंगा नदी लागे. एका हातात पाटीदप्तर, दुसऱ्या हातात चपला अशा रीतीने नदीतून एकेक पाऊल उचलत पलीकडे जाताना त्या मुलाची त्रेधातिरपीट उडे. पण त्याने तेवढ्या कारणाने कधी शाळेत जायचा कंटाळा केला नाही.

बरोबरची इतर मुलं कंटाळा करीत. नदीच्या वाळवंटात खेळत बसत. शाळेला




BVBK-0400445

दांडी मारत. पण त्याने कधी शाळा बुड-विली नाही.

त्यानंतर वडिलांच्या बदलीमुळे त्याला कितीदा तरी शाळा बदलाव्या लागल्या. कधी बलसाडला तर कधी कांडल्याला. पण त्याने नियमित अभ्यासात कधी खंड पडू दिला नाही.

त्यामुळे त्याचा वर्गात नेहमीच पहिला नंबर असे.



पंतप्रधान मोरारजी देसाई

१९७७ मध्ये तोच मुलगा भारताचा पंतप्रधान झाला आहे.

त्याचे नाव आहे मोरारजी देसाई !

*

## २

मोरारजींचा जन्म २९ फेब्रुवारी १८९६ साली सुरत जिल्ह्यातील भदेली या खेड्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रणछोडजी देसाई होते.

देसाई घराण्यातील पूर्वज हे पेशव्यांचे वतनदार होते. हे घराणे ब्राह्मण असून देसाई हे नाव त्यांना वतनावरून मिळाले होते.

मोरारजींच्या जन्मकाळी देसाई घराण्यातील लोक शेती किंवा सरकारी

नोकरी करीत होते. मोरारजीचा जन्म त्याच्या आजोळी झाला. त्याच्या आईचे वडील शेती करीत असत. ते स्वभावाने अत्यंत करारी होते. त्यांनी एकदा कुणाला शब्द दिला की तो कधीही मोडत नसत. त्यांच्याकडूनच मोरारजीने करारीपणाचा वारसा घेतला.

भावनगर राज्यातील कांडला येथील इंग्लिश शाळेत मोरारजीचे वडील हेड-मास्तर होते. ते स्वभावाने कडक व शिस्त-प्रिय होते. दुसरी, तिसरी व चौथ्या इयत्तेत असताना मोरारजी वडिलांच्या बरोबर कांडल्याला राहिला होता.

एक दिवस छोट्या मोरारजीला शाळेतून यायला उशीर झाला. त्याला शाळेतून नेण्या-आणण्याचे काम करणारा नोकर फार उशीरा शाळेत पोचला होता. शाळा सुटून बराच वेळ झाल्याने मोरारजी

मुख्याध्यापकांच्या कचेरीत बसला होता. नेहमीच्या जागी मोरारजी नसल्याचे पाहून नोकर तसाच परत गेला. घरी गेल्यावर त्याने मोरारजीच्या वडिलांना स्वतःला शाळेत जायला उशीर झाल्याचे सांगितले नाही, तर त्याने खोटेच सांगितले की मोरारजी कुठेतरी भटकायला गेला आहे.

इकडे नोकराची बराच वेळ वाट पाहून मुख्याध्यापकांनी मोरारजीला स्वतःच्या नोकराबरोबर घरी पाठविले. मोरारजीच्या वडिलांनी घरी पोहोचताच मोरारजीला चांगलाच चोप दिला. नोकराने खोटे सांगितले ते त्यांना माहित नव्हते. बसलेल्या मारामुळे मोरारजीला दुसऱ्या दिवशी चांगलाच ताप आला. त्यामुळे तो शाळेत जाऊ शकला नाही. तेव्हा त्याची चौकशी करण्याकरिता शाळेचे मुख्याध्यापक त्यांच्या घरी आले. मोरारजीच्या वडिलांनी

त्यांना मोरारजी आदल्या दिवशी शाळेतून उशीरा आल्याचे सांगितले. त्यावर मुख्याध्यापकांनी खरे काय घडले होते ते त्यांना सांगितले. ते ऐकून चूक नसताना मोरारजीला शिक्षा केल्याबद्दल मोरारजीच्या वडिलांना फार वाईट वाटले.

पण वडिलांनी शिक्षा करताना गैरसमजुतीने केली होती तरी चांगल्या हेतूने केली होती. त्यामुळे मोरारजीने ती गोष्ट मनाला लावून घेतली नाही. त्या घटनेमुळे त्याच्या मनातील वडिलांबद्दलचा आदर जराही कमी झाला नाही. उलट वाढलाच.

भदेली येथे असताना मोरारजीचा मामापण त्याच्याच शाळेत जात असे. तो फक्त सहा महिन्यांनी मोरारजीपेक्षा मोठा होता. तो अनेकदा शाळा बुडवीत असे. त्याला घरून खाऊसाठी पैसे मिळत

असत. मोरारजीला मात्र कधी मिळाले नाहीत. पण म्हणून त्याला मामाचा कधी हेवा वाटला नाही. आपल्यालाही दुकानातून खाऊ घेण्यासाठी पैसे मिळावेत असे त्याला कधी वाटले नाही.

त्याच काळापासून कितीही कठिण परिस्थिती आली तरी कोणाकडे मदत मागायची नाही असा मोरारजीचा स्वभाव बनला.

तसेच त्यांच्या गावात कोळी लोकांची वस्ती होती. मासेमारी करून ते चांगले पैसे मिळवीत. तरी पण त्यांना दारूचे व्यसन असल्याने त्यांना दारिद्र्यात दिवस काढावे लागत. ते पाहून छोट्या मोरारजीच्या मनात दारूबद्दल अढी उत्पन्न झाली. दारू पिणे आरोग्याला तर वाईट आहेच; पण कौटुंबिक स्वास्थ्याला पण फार वाईट आहे असे त्याचे ठाम मत झाले.

*

# ३

मोरारजीला खेळाची फार आवड होती. क्रिकेट, विटीदांडू, गोट्या, हुतूतू, खो-खो तसेच टेनिस व पोहणे हे त्याचे आवडते खेळ. आणि ते सर्व तो उत्तम प्रकारे खेळू शकत असे. शाळेनंतरच्या उरलेल्या वेळात तो हे खेळ खेळत असे. खेळण्यासाठी शाळेचे तास त्याने कधी वाया घालविले नाहीत. कुठल्याही गोष्टीला जरुरीपेक्षा जास्त महत्त्व देणे त्याला पसंत नव्हते. त्यामुळे अभ्यास व खेळ दोन्हींमध्ये त्याची सारखीच प्रगती होती.

सर्व खेळ चांगले खेळता येत असूनही तो कुठल्याही स्पर्धांमध्ये भाग घेत नसे. तसेच पुस्तकातील किडा म्हणवून घेण्याइतका अभ्यासही करीत नसे. त्यामुळे परी-

क्षेत जरी तो चांगल्या रीतीने पास होई तरी पहिला-दुसरा नंबर मिळविण्याचा त्याने कधी प्रयत्न केला नाही.

मोरारजी मॅट्रिकच्या वर्गात गेला तेव्हा त्याचे वय पंधरा वर्षांचे होते. त्या काळी मॅट्रिकला बसण्यास किमान वय सोळा असावे लागे. तेव्हा त्याला त्या वर्षी परीक्षेला बसता आले नाही. त्याचे एक वर्ष वाया गेले.

त्यानंतर मोरारजींचे लग्न ठरले. मुलीचे नाव होते गजराबेन. वय होते फक्त अकरा वर्षे. तिचे वडील सौराष्ट्रात सरकारी अधिकारी होते.

लग्नाची गडबड सुरू झाली. पण दुर्दैवाने लग्नाच्या दोनच दिवस आधी मोरारजींच्या वडिलांना अपघात झाला. ते विहिरीत पडून मरण पावले.

मोरारजीचे आपल्या वडिलांवर फार प्रेम होते. वडिलांच्या मृत्यूमुळे त्याला फार मोठा धक्का बसला. त्याचे मन उदास झाले. तोपर्यंत त्याच्या लग्नाचे काही विधी झाले होते. त्यामुळे त्याला नाइलाजाने लग्न उरकून घ्यावे लागले.

एकीकडे विवाहासारखे मंगल कार्य तर दुसरीकडे वडिलांचा अंत्यविधी. असा विचित्र अनुभव मोरारजीला वयाच्या सोळाव्या वर्षी आला.

वडिलांच्या मृत्यूनंतर मोरारजी पत्नी, आई व भावंडांबरोबर आजोळी गेला. पण तिथे त्याच्या आईचे तिच्या आईशी पटले नाही. तेव्हा ती मुलांना घेऊन परत बल-साडला आली. त्या वेळी त्यांच्या घरात एकूण नऊ माणसे होती. मोरारजी, त्याची आई, वडिलांची आई, तीन भाऊ, दोन बहिणी व पत्नी गजराबेन. सर्व भावंडांत

मोठा असल्याने सगळ्या कुटुंबाचा भार सोळा वर्षांच्या मोरारजीवर पडला.

फार लहान वयात मोठी जबाबदारी त्याच्यावर पडली. त्यामुळे त्याचा स्वभाव गंभीर बनला. आधीच तो समजूतदार होता. त्यात गंभीरतेची भर पडली आणि प्रत्येक गोष्टीचा सर्व बाजूंनी विचार करण्याची त्याला सवय लागली.

*

## ४

मॅट्रिकच्या परीक्षेत मोरारजीचा नंबर सबंध मुंबई इलाख्यात पंचेचाळिसावा आला. त्यामुळे त्याला कॉलेज-शिक्षणासाठी दहा रुपये मासिक शिष्यवृत्ती मिळाली. त्याचबरोबर तो शिकवण्या करी. अशा रीतीने मिळणारे सर्व पैसे तो घरी आईला पाठवून देई.

त्याने मुंबईच्या विल्सन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. गरीब विद्यार्थ्यांसाठी असलेल्या एका वसतीगृहात तो राहू लागला. तेथे त्याला राहणे व जेवणखाण मोफत मिळत असे. लहानपणापासूनच त्याला आपली सर्व कामे स्वतः करण्याची संवय होतीच. वसतीगृहात राहून ती आणखीनच अंगवळणी पडली. त्याच काळात त्याने व्यायाम वगैरे करून उत्तम आरोग्य संपादन केले.

मुंबईसारख्या महागड्या नवनव्या फॅशन्सचे माहेरघर असलेल्या शहरात राहूनदेखील मोरारजीने आपला साधेपणा सोडला नाही. नाटक-सिनेमाची त्याला आवड नव्हती. कॉलेजच्या जीवनात त्याने सर्व मिळून तीन-चार नाटके व पाच-सहा सिनेमे पाहिले. अन् ते पण मित्रांनी जबरदस्तीने नेले म्हणून.

एक गोष्ट त्यांना बघायला फार आवडे. ती म्हणजे क्रिकेट मॅच! मग ती शहरात कुठल्याही भागात, कितीही लांब अंतरावर असो, तो बघायला जात असे. पण त्यासाठी त्याला पैसे खर्च करणे शक्य नव्हते. तेव्हा तो ट्रॅम किंवा बसने न जाता पायी जात असे. मैदान कितीही दूर असलं तरीही!

आपल्या संपूर्ण जीवनात मोरारजीने जर कधी लबाडी केली असेल तर ती क्रिकेट मॅचसाठीच. मॅचच्या तिकिटाला त्याच्याजवळ पैसे नसत. तेव्हा तो संधी साधून रक्षकाची नजर चुकवून मैदानात घुसे.

त्या काळात मुंबई शहर हे संपूर्ण देशातील राजकीय हालचालीचे केंद्र होते. लोकमान्य टिळक, गोपाळकृष्ण गोखले, भुलाभाई देसाई वगैरे पुढाऱ्यांची मुंबईत भाषणे होत.

पण त्या वेळपर्यंत विद्यार्थी राजकारणात फारसा भाग घेत नसत. त्याप्रमाणे मोरारजींनेही राजकारणात भाग घेतला नव्हता. पण १९१५ च्या काँग्रेस अधिवेशनात प्रथमच त्याने स्वयंसेवक म्हणून काम केले.

*

५

आधीच मोरारजीजवळ पैशाची कमतरता होती. चांगले मार्क मिळवून पास झाले तरच शिष्यवृत्ती चालू राहाणार! इंटरची परीक्षा जवळ आली तेव्हा तो मनात घाबरला. अभ्यास पूर्ण झाला नाही असे त्याला वाटू लागले. म्हणून शेवटले दोन महिने त्याने खूप झटून रात्रंदिवस अभ्यास केला. पण त्याचा परिणाम उलट

झाला. पहिला पेपर गणिताचा होता. ज्यांनी गणित हा मुख्य विषय घेतला होता त्यांना १०० मार्कांचा पेपर सोडवावा लागे. गणित मुख्य विषय नसलेल्यांना ७५ मार्कांचाच पेपर सोडवायचा असे. मोरारजीने गणित हा मुख्य विषय घेतलेला होता. तरीही त्याने फक्त ७५ मार्कांचेच प्रश्न सोडविले, संपूर्ण १०० मार्कांचा पेपर सोडवायला हवा होता. हे त्याला बाहेर पडल्यावर कळाले. त्याबरोबर फर्स्ट क्लास-मध्ये पास होण्याच्या त्याच्या आशा मावळल्या. दुसऱ्या दिवशी गणिताचा दुसरा पेपर होता. पण त्याला काय लिहावे तेच सुचेना. तीन तासांत जेमतेम १० मार्कांचे प्रश्न सोडवून तो बाहेर पडला. नंतर संस्कृतचा पेपर होता. त्याचीही तीच गत झाली. तेव्हा या वर्षी आपण नापास होणार याबद्दल त्याला खात्री वाटू लागली. पण सुदैवाने तो कसाबसा पास झाला.

इंटर पास झाल्यावर त्याने बी. ए. ला सायन्सचे विषय घेतले. परीक्षेच्या वेळी पुन्हा तो घाबरला. पण तरीही फर्स्ट क्लास मध्ये पास झाला. त्यामुळे त्याला पन्नास रुपयांची शिष्यवृत्ती मिळू लागली. मग



मोरारजी देसाई १९१८ साली नॅशनल कॅडेट कोअरमध्ये असताना

त्याने प्रोफेसर होण्याच्या इराद्याने एम्. एस्सी. करायचे ठरविले. त्या वर्षी त्याने युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोअरमध्ये चांगले काम केले. त्यामुळे अधिकारी म्हणून त्याची नेमणूक झाली.

*

## ६

त्यानंतर मोरारजीभाईंनी एका प्रोफेसरच्या सल्ल्यावरून सिव्हिल सर्व्हिसच्या एका जागेसाठी अर्ज केला. यू. टी. सी. च्या कॅप्टनकडून त्यांना फार चांगले प्रमाणपत्र मिळाले. बहुतेक त्याचमुळे मोरारजींना मुलाखतीसाठी बोलावण्यात आले. बोलावलेल्या लोकांमध्ये मोरारजी शेवटले होते, अन् त्यांचा नंबर होता १३ वा. इंग्लिश लोक १३ वा नंबर अशुभ

समजतात. पण मोरारजींना तो १२ वा नंबर भाग्यकारक ठरला. फार मोठा वशिला वगैरे नसतानाही ते निवडले गेले, आणि मे १९१८ मध्ये त्यांची अहमदाबादला डेप्युटी कलेक्टर म्हणून नेमणूक झाली.

आपल्या हातून लोकसेवा घडावी या हेतूने मोरारजी सिव्हिल सर्व्हिसमध्ये दाखल झाले होते. इ. स. १९१८ ते १९३० अशी बारा वर्षे त्यांनी ही नोकरी केली. त्या काळात मुंबई प्रांताच्या वेगवेगळ्या जिल्ह्यात त्यांना फिरावे लागले. १९३० साली महात्मा गांधींनी सुरू केलेल्या कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेण्यासाठी त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात झाली.

आपल्या बारा वर्षांच्या सरकारी नोकरीच्या काळात मोरारजींनी एक कर्तबगार

व कर्तव्यतत्पर अधिकारी म्हणून मोठा नावलौकिक मिळविला. पण लोकसेवेच्या हेतूने त्यांनी नोकरी पत्करली होती. ती लोकसेवा व राष्ट्रसेवा आपल्या हातून घडत नाही अशी रुखरुख त्यांना वाटत राहिली. ब्रिटिश सरकारची नोकरी करून आपला हेतू साध्य होणार नाही याची खात्री पटताच त्यांनी नोकरी सोडली आणि कायदेभंगाच्या चळवळीत दाखल झाले.

म. ग्रं. सं. वाचनालय शाखा.
दा. क्र. ८४५
विषय चारित्र

कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्या-बद्दल मोरारजींना १९३० साली कारा-वासाची शिक्षा झाली. कारावासातून सुटून आल्यावर त्यांनी गुजरात प्रदेश कॉंग्रेसचे चिटणीसपद स्वीकारले. १९३१ ते १९३७

पर्यंत ते या पदावर होते. त्यानंतर पुन्हा १९३९ ते १९४६ पर्यंत त्यांना तीच जबाबदारी स्वीकारावी लागली.

सन १९३७ साली प्रथमच मंत्री म्हणून मोरारजींचा मुंबई प्रांताच्या बाळासाहेब खेर मंत्रिमंडळात समावेश झाला. त्यानंतर वेगवेगळ्या खात्यांचे मंत्री म्हणून त्यांनी काम केले.

इ. स. १९५२ साली बाळासाहेब खेर निवृत्त झाले. त्यांच्या जागी मोरारजींची मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री म्हणून नेमणूक झाली. त्या पदावर ते १९५६ पर्यंत होते.

मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्य-कारभारात बऱ्याच सुधारणा केल्या. काही ऐतिहासिक महत्त्वाचे कायदे केले. 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वावर आधारित कूळ-कायदा, तसेच पुरुषांना एकापेक्षा अधिक विवाह करण्यास प्रतिबंध करणारा 'द्विभार्या


प्रतिबंधक कायदा' हे त्यांच्याच अमलात निर्माण झाले. त्याचप्रमाणे तुरुंगात असणाऱ्या गैरसोयी दूर करून त्यांनी कैद्यांना अनेक सोयी मिळवून दिल्या. शेती, पोलिसखाते व न्यायखाते यांतही त्यांनी फार सुधारणा केल्या.

त्याच काळात मोरारजींनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला विरोध केला आणि ते आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. तरीही इ. स. १९५६ साली भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वावर मुंबई प्रांताची महाराष्ट्र व गुजराथ अशी दोन राज्यांत विभागणी झाली; तेव्हा मोरारजींनी मुख्यमंत्रिपद सोडले.

❊

## ८

त्याच वर्षी मोरारजींना पं. नेहरूंनी दिल्लीला बोलावले. त्यांना केंद्रसरकारमध्ये व्यापार व उद्योगमंत्री करण्यात आले.



पं. नेहरूंबरोबर मोरारजी देसाई

इ. स. १९५८ मध्ये टी. टी. कृष्णम्माचारी यांनी अर्थमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या जागी मोरारजींना अर्थमंत्री करण्यात आले. भारताचे अर्थमंत्री या

नात्याने त्यांनी इंग्लंड, अमेरिका, कॅनडा वगैरे देशांना भेटी दिल्या.

ह्या वेळपर्यंत मोरारजी देसाई हे नाव भारतभर एक कर्तव्यकठोर व उत्तम कारभार करणारे नेते म्हणून प्रसिद्धीस आले.

ते अर्थमंत्री असतानाच चीनने भारतावर हल्ला केला. त्यामुळे संरक्षणखर्च वाढला. देशाची आर्थिक परिस्थिती बिघडली, तेव्हा मोरारजींनी मोठ्या कौशल्याने परिस्थिती हाताळली.

इ. स. १९६३ साली कामराज योजनेनुसार त्यांनी मंत्रीपद सोडले. इ.स. १९६६ पर्यंत ते कॉंग्रेस पक्षाचे काम करीत राहिले. इ. स. १९६४ साली पंडित जवाहरलाल नेहरूंचे निधन झाले. त्यांच्यानंतर लालबहाद्दूर शास्त्री पंतप्रधान झाले. जेमतेम दोन वर्षांच्या आतच त्यांचेही अकाली

निधन झाले. तेव्हा पंतप्रधानांची जागा पुन्हा रिकामी झाली. त्या जागेसाठी मोरारजी देसाई व इंदिरा गांधी हे दोन उमेदवार उभे राहिले. पण काँग्रेस अध्यक्ष कामराज यांनी मोरारजींना विरोध केला. त्यामुळे इंदिरा गांधी यांची पंतप्रधानपदी नेमणूक झाली.

इ. स. १९६७ साली पुन्हा निवडणुका आल्या. पुन्हा मोरारजी व इंदिरा गांधी पंतप्रधानपदासाठी उभे राहिले. पण यावेळी तडजोड करण्यात आली. इंदिरा गांधी पंतप्रधान व मोरारजींना उप-पंतप्रधानपद देण्यात आले; व पुन्हा त्यांच्याकडे अर्थखातेही देण्यात आले.

त्यावेळी देशाची आर्थिक परिस्थिती फार बिकट होती. अनेक राज्यांत बराच काळ दुष्काळी परिस्थिती होती. विदेशी मदतही अपुरी होती. केंद्रसरकार व बिगर-



श्रीमती इंदिरा गांधींबरोबर मोरारजी देसाई

काँग्रेस राज्यसरकारे यांचे संबंध बिघडले होते. पण मोरारजींनी परिस्थिती मोठ्या धैर्याने हाताळली. देशाची विस्कटलेली आर्थिक घडी पुन्हा नीट बसविली.

# ९

मोरारजी हे गांधीवादी आहेत. सत्ताधारी काँग्रेसवाले गांधींची शिकवण विसरू लागले ते मोरारजींना पसंत नव्हते. शेवटी काँग्रेसमध्ये दोन गट पडले आणि १९६९ मध्ये काँग्रेसचे विभाजन झाले. काँग्रेस व संघटना काँग्रेस असे दोन स्वतंत्र पक्ष निर्माण झाले. मोरारजींनी उपपंतप्रधानपदाचा राजीनामा दिला आणि संघटना काँग्रेसचे अध्यक्ष व लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून त्यांची निवड झाली.

महात्मा गांधींचा उपोषणाचा मार्ग मोरारजींनी अनेकदा उपयोगात आणला. १९७५ साली गुजरात विधानसभा बरखास्त करावी यासाठी त्यांनी उपोषण सुरू केले. उपोषणाच्या पाचव्या दिवशी

गुजरातभर विद्यार्थ्यांनी दंगली सुरू केल्या. केंद्रसरकारला शेवटी गुजरात विधानसभा बरखास्त करणे भाग पडले.

१९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी जाहीर केली. जनतेला या काळात सरकारकडून फार त्रास झाला. हजारो लोकांना विनाकारण तुरुंगात डांबून ठेवले होते. सरकारविरुद्ध बोलणे किंवा लिहिणे यांना बंदी करण्यात आली. लोकशाही असूनही देशातील लोकांना कसलेही स्वातंत्र्य राहिले नाही. कॉंग्रेस सरकारबद्दल लोकांच्या मनात चीड उत्पन्न झाली.

या काळात जयप्रकाश नारायण यांच्याबरोबरच इतरही सर्व विरोधी नेत्यांना कॉंग्रेस सरकारने बंदिवान करून ठेवले होते. त्यात मोरारजीही होते.

१९७७ साली मार्चमध्ये निवडणुका घेण्याची घोषणा पंतप्रधान इंदिरा गांधींनी

केली. सर्व विरोधी नेत्यांची सुटका झाली. त्याबरोबर जयप्रकाश नारायण यांनी प्रमुख विरोधी पक्षांनी एकत्र येऊन एक पक्ष स्थापन करावा असे सुचविले. त्यावर मोरारजींनी पुढाकार घेऊन संघटना कॉंग्रेस, जनसंघ, भारतीय लोकदल व समाजवादी पक्ष या पक्षांना एकत्र आणले. जनतापक्षाची स्थापना झाली.

निवडणुकांत जनता पक्षाने कॉंग्रेसचा फार मोठा पराभव केला. जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले. मोरारजी देसाई पंतप्रधान झाले.

❊

## १०

पंतप्रधान मोरारजी देसाई यांचे खासगी जीवन अतिशय साधे आहे. त्यांचे कुटुंब

लहान आहे. ते, त्यांच्या पत्नी गजराबेन, बहीण किकीबेन, मुलगा कांतीभाई व एक मुलगी. मुलगा व मुलगी दोघांचीही लग्ने



पंतप्रधान मोरारजी देसाई पत्नी गजराबेन यांचेसह

झालेली आहेत. मोरारजी जेव्हा प्रवासाला निघतात तेव्हा त्यांची सर्व व्यवस्था मुलगा कांतीभाई बघतो.

१९७८ साली मोरारजी ८३ वर्षांचे झालेत. पण त्यांचा उत्साह मात्र तरुणांना लाजवेल असा आहे. त्यांचे आरोग्य उत्तम

आहे. काम करण्याचा उरक फार आहे. ठराविक काम ठराविक वेळात झालेच पाहिजे हा त्यांचा नियम आहे.

त्यांची दिनचर्या कधी बदलत नाही. त्यांची राहणी फारच साधी आहे. रोज सकाळी लवकर उठून ते योगासने करतात. सात वाजता ते चरख्यावर सूत कातताता. स्वतः कातलेल्या सुताचेच कपडे ते वापरतात.

मोरारजी देसाई हे पूर्ण शाकाहारी आहेत. ते दिवसातून एकच वेळ भोजन करतात. दुसऱ्या वेळी फक्त थोडी फळे खातात. त्यांचे जेवण फार साधे असते. पालेभाजी, फळभाजी, कढी आणि चपाती. आंबट, तिखट, तेलकट पदार्थ त्यांना आवडत नाहीत. तसेच ते चहा, कॉफीही कधी घेत नाहीत. साधं खाणं आणि साधी राहणी ! याचमुळे त्यांचे आरोग्य या

वयातही एवढे उत्तम आहे. अन् तरुणापेक्षाही जास्त काम ते करू शकतात.

नियमितपणा हा त्यांच्या स्वभावाचा विशेष आहे. रोज सूर्योदयापूर्वी ते उठतात. तसेच रात्री अकराच्या सुमाराला नियमितपणे झोपी जातात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे भारताचे पंतप्रधान असूनही ते साध्या चटईवरच झोपतात.

मोरारजीभाई नाटक-सिनेमा फारसे बघत नाहीत. पण नवलाची गोष्ट म्हणजे त्यांनी एका सिनेमात काम केलं आहे ! त्या सिनेमाचं नाव आहे, 'बापूने कहा था'. त्यात त्यांनी बारा मिनिटांची भूमिका केली आहे. त्यातला त्यांचा अभिनयही अगदी कसलेल्या नटासारखा झाला आहे. तसेच 'योगेश्वर कृष्ण' या श्रीकृष्णाच्या जीवनावरील आगामी चित्रपटाची पटकथाही त्यांनी लिहिली आहे.

मोरारजींना विदेशी पद्धतीची औषधे, इंजेक्शने घ्यायला आवडत नाही. देशी पद्धतीची औषधे व निसर्गोपचार ते पसंत करतात.

परदेशात जाताना प्रत्येकाला ठराविक लस टोचून घ्यावी लागते. तसा सरकारी नियमच आहे. पण मोरारजी लस टोचून घेत नाहीत. देशातच नव्हे तर परदेशातही ते लस टोचून घेत नाहीत.

दारू पिणे तर ते फारच वाईट समजतात. १९७८ च्या जूनमध्ये ते अमेरिकेत गेले होते. प्रेसिडेन्ट जिमी कार्टर यांनी त्यांच्या सन्मानार्थ मेजवानी दिली. त्यांच्या प्रथेनुसार भोजनापूर्वी प्रत्येकाने दारू घेणे आवश्यक होते. पण त्यांनी आपल्या ग्लासात साधे पाणी भरून घेतले व तो ग्लास प्रेसिडेन्ट कार्टर यांच्या

ग्लासाला टेकवून त्यांना शुभेच्छा व्यक्त केली. ते साधे पाणीच ते प्याले.

असे आहेत आपले पंतप्रधान !

साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचे, शिस्तीचे भोक्ते. दिवसभर शेकडो लोकांना भेटावे लागले, हजारो फायली



BVBK-0400445

पंतप्रधान मोरारजी देसाई घरी काम करत असताना

चाळाव्या लागल्या, तरी रात्री त्यांचे टेबल

स्वच्छ असते! आजचे काम उद्यावर ढकलणे त्यांना ठाऊक नाही !

त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आपणही शिस्त आणि साधेपणा अंगी बाणवण्याचा प्रयत्न करायला हवा !

---

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. ९८५ दिनांक ......
विषय बालवा. क्र. ..........

स्वच्छ असते! आजचे काम उद्यावर ढकलणे त्यांना ठाऊक नाही !

त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आपणही शिस्त आणि साधेपणा अंगी बाणवण्याचा प्रयत्न करायला हवा !

---

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. ८८५ दिनांक ....
विषय बालवा... क्र. ........